| MHKO030024142018 | **म.कौ.हिं.म.सं.का.अर्ज नं.१०२/२०१८**<br>**<u>निशाणी</u>** <u>क्र. १९ व २० वर आदेश</u><br>मिनाक्षी प्रितम मार्ले **वि**.<br>जयश्री अशोक मार्ले |
|---|---|

नि. १९ वर वि. प. क्र. १ ने व नि. २० वर वि. प. क्र. २ व ३ ने प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन सदर काम प्रस्तुत वि. प. यांचेविरूध्द चालण्यास पात्र नसल्याने मूळ अर्ज नामंजूर करणेसंदर्भात केलेला आहे.

<u>वि.प. १ तसेच वि. प. २ व ३ यांचा अर्ज थोडक्यात खालीलप्रमाणे -</u>

२. वि.प. क्र. १ ते ३ यांच्या कथनानुसार, अर्जदार यांचे पती श्री. प्रितम मार्ले हे पूर्वी घटस्फोटीत होते. दि. २७/११/२०१७ रोजी श्री. प्रितम मार्ले यांचा अर्जदार यांचेशी विवाह झाला. परंतू मतभेदामुळे अर्जदाराचे पती व वि. प. १ यांचेपासून वि. प. २ व ३ प्लॉट नं. १५० हिंद कॉ- ऑप. सोसायटी रूईकर कॉलनी, कोल्हापूर या मिळकतीमध्ये सन २००५ पासून पहिल्या मजल्यावर विभक्त राहत आहेत. तसेच वि. प. १ या अर्जदार व त्यांचे पतीसोबत एप्रिल, २०१८ पर्यंत वरील नमूद मिळकतीमध्ये दूस-या मजल्यावर राहत होत्या. परंतु सध्या वि. प. १ या आउट हाउस मध्ये स्वतंत्र राहत आहेत. तसेच तळ मजल्यावरील दोन खोल्यांमध्ये वि. प. २ यांचा व्यंकटेश्वरा एंटरप्रायझेस या नावाने स्वतंत्र व्यवसाय आहे व उर्वरीत दोन खोल्या भाडयाने दिलेले आहे. वि. प. १ यांच्या म्हणण्यानुसार सदर मिळकतीच्या प्रॉपर्टी कार्डवर त्यांचे नाव मालकी हक्कात नमूद आहे. त्यामूळे अर्जदार किंवा अर्जदारांच्या पतीचा या मिळकतीवर काहीही हक्क नाही. अर्जदार यांनी प्रॉपर्टीच्या हव्यासापोटी सदरचा अर्ज केलेला आहे. वि. प. १ ते ३ हे अर्जदार सोबत एकत्रीत वास्तव्यात राहत नसल्यामूळे अर्जदार यांचा मूळ अर्ज त्यांचेविरूध्द चालण्यास पात्र नाही. सबब सदर अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे.

३. अर्जदार यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे नि. २१ व नि. २२ अन्वये दाखल केले असून अर्जदार यांनी त्यांचे मुळ अर्ज नि.क्र.१ मधील कलम १२ मध्ये सदर अर्ज या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात कसा येतो हे स्पष्ट केले आहे. अर्जदार व त्यांचे पती सध्या सदर मिळकतीमध्ये दूसऱ्या मजल्यावर राहतात. सन २०१३ मध्ये अर्जदार यांचे पती व वि. प. क्र. २ यांच्या व्यवसायाच्या वाटण्या झाल्या त्यावेळी वि. प. क्र. २ यांनी श्री. व्यंकटेश्वरा एंटरप्रायजेस या भागीदाराचे व रॅायल्टीचे रक्कम रू. २५ लाख अर्जदार यांचे पतींना दयावयाचे होते परंतु वि. प. २ ने पैसे बुडवण्याच्या हेतूने स्पे. क. नं. १९६/२०१५ दावा दाखल केला. वि. प. २ व ३ हे सदर मिळकतीमध्ये पहिलया मजल्यावर राहतात. तसेच अर्जदार व त्यांचे पती सदर मिळकतीच्या दूसऱ्या मजल्यावर राहत आहेत व वि. प. १ या आउट हाउसमध्ये राहण्यास आहेत. तसेच तळमजल्यावरील चार खोल्यांपैकी दोन खोल्यांमध्ये वि. प. २ चे ऑफीस आहे व उर्वरीत दोन खोल्यांमध्ये अर्जदार व त्यांचे पती त्यांचे सामान ठेवतात व राहतात. अशाप्रकारे अर्जदार, त्यांचे पती व वि. प. १ ते ३ हे एकाच मिळकतीमध्ये राहत असलेने ते एकत्रीत वास्तव्यात आहेत. सदरचा अर्ज अर्जदार व त्यांचे पतीला मानसिक व शारिरीक त्रास देण्याकरीता केलेला आहे. सबब, सदर वि.प. १ ते ३ यांचा अनुक्रमे नि. क्र. १० व नि.क्र. २० चा अर्ज खर्चासह नामंजूर करणेविषयी विनंती केली आहे.

४. अर्जदार व वि.प. यांच्या विधीज्ञांचा विस्तृत युक्तिवाद ऐकला.

५. वि.प. तर्फे त्यांचे विधिज्ञांनी असा युक्तिवाद केला की, अर्जदार व वि. प. १ ते ३ यांचे नाते कौटुंबिक नातेसंबंधात येत नाही. अर्जदार ज्या घरात राहतात ते घर वि. प. १ च्या नावे आहे. त्याबाबतचे प्रॉपर्टी कार्ड कामामध्ये दाखल आहे. त्यामुळे अर्जदार व अर्जदारांच्या पतीचा घर मिळकतीशी काहीही

संबंध नाही. तसेच अर्जदार व वि. प १ ते ३ हे एकत्रित वास्तव्यात राहत नाहीत. अर्जदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये त्या वि. प. १ ते ३ सोबत राहतात असे कोठेही नमूद केलेले नाही. याउलट अर्जदार यांचे त्या वि. प. सोबत एकाच मिळकतीमध्ये राहतात असे कथन आहे. प्रस्तुतच्या वरील नमूद घरामध्ये वि. प. २ व ३ हे पहिल्या मजल्यावर राहतात, वि. प. नं. १ या आउट हाउसमध्ये राहतात व अर्जदार व त्यांचे पती हे दूसऱ्या मजल्यावर राहतात. त्यामुळे अर्जदार या वि. प. १ ते ३ सोबत एकत्रीत वास्तव्यात राहत नाहीत. तसेच सदर घर हे वि. प. १ च्या नावे आहे. सदरची घरमिळकत ही वि. प. १ ची स्वतंत्र मिळकत आहे. त्यामुळे त्यावर अर्जदारांच्या पतीचा कोणताही हक्क किंवा त्यामध्ये हिस्सा येत नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

६. अर्जदार तर्फे विधिज्ञांनी असा युक्तिवाद केला की, सदरचा अर्ज कोणत्या तरतूदीनुसार दाखल केलेला आहे याबाबत नमूद नाही. घरमिळकतीबाबतची मालकी ही गुणवत्तेवर ठरविता येईल, वि. प. १ या अर्जदारांच्या सासू वि. प. २ व ३ हे अर्जदारांचे थोरले दीर व जाउ असे आहेत. त्यामूळे अर्जदार व वि. प. १ ते ३ यांचेमध्ये कौटुंबिक नातेसंबंध असल्याचे स्पष्ट होते. वि. प. १ ते ३ अर्जदार यांचेवर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

वि. प. च्या विधिज्ञांनी त्यांच्या कथनासाठी खालील तीन न्यायनिर्णय सादर केले.

***(1) S. R. Batra vs. Taruna Batra, reported in 2006 DGLS(SC) 1183***

***(2) Varun Malik vs. Payal Malik reported in the Judgment declaired on 29 July, 2010***

*(3) <u>Kishor vs. Sou. Shalini, Criminal Writ Petition No. 37/2008</u>*

वरील न्यायनिर्णयांचे सखोलपणे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, प्रस्तुत कामातील व सदर न्यायनिर्णयातील तथ्य वेगवेगळी असलेने, वरील न्यायनिर्णय इथे उपयोगी पडत नाही.

७. उभयपक्षांचा युक्तीवाद, अभिलेखावरील कागदोपत्री पुरावा यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार यानी मुळ अर्ज नि.१ मध्ये केलेले कथन हे प्रतिज्ञेवर केलेले आहे. तसेच, अर्जदार यांनी त्यांच्या मूळ अर्जात असे कथन केले आहे की, अर्जदार या मराठा समाजाच्या असल्यामुळे वि. प. १ या त्यांना जातीवरून टोचून बोलणे, शिविगाळ करणे व मारहाण करणे असे प्रकार करत असत. तसेच अर्जदार जिन्यावरून जात येत असताना वि. प. २ हे अश्लील हावभाव करणे, अडवणूक करणे, जीवे मारण्याची धमकी देणे, धक्काबुक्की करणे, ओरडणे अशाप्रकारे शाब्दीक, भावनिक व शारिरीक त्रास देत असतात. तसेच अर्जदार यांनी त्याच्या माहेरहून आणलेली ॲक्टीवा दुचाकी वि. प. २ व ३ यांनी बंद करून जिन्यास कुलूप लावले आहे. अशापरिस्थितीत, अर्जदार व वि. प. १ ते ३ हे एकत्रीत वास्तव्याच्या संज्ञेत येतात की नाही, हे पाहणे गरजेचे आहे. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता, अर्जदार व वि. प. १ ते ३ यांचेमध्ये कौटुंबिक नातेसंबंध असल्याचे स्पष्ट होते. अर्जदार व वि. प. १ ते ३ हे सध्या एकाच घरमिळकतीमध्ये विभक्त राहत आहेत, असे असले तरी वि. प. १ ते ३ यांचे अर्जदारांना जिन्यावरून येताना जाताना टोचून बोलणे, शिविगाळ करणे किंवा अर्जदाराने वि. प. २ बाबत जी कथने केली आहेत, ती नाकारता येणार नाहीत.

तसेच वि. प. १ या अर्जदार व त्यांच्या पतीसोबत एप्रिल २०१८ पर्यंत एकत्र वास्तव्यात होते. तसेच वि. प. २ यांचे तळमजल्यातील चार खोल्यांपैकी दोन खोल्यांमध्ये ऑफीस असून उर्वरीत दोन खोल्यांमध्ये अर्जदार

व त्यांचे पती हे सामान ठेवतात व राहतात. त्यामूळे हे सर्व एकाच घरमिळकतीमध्ये राहत असून अर्जदारांना त्या घरमिळकतीमध्ये जिन्यावरून येताना जाताना किंवा त्या मिळकतीमध्ये अर्जदाराने कथन केल्याप्रमाणे वि. प. १ ते ३ कडून होणारा त्रास नाकारता येणार नाही. त्यामुळे कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा,२००५ चे उद्दीष्ट लक्षत घेउन, अर्जदार, त्यांचे पती व वि. प. १ ते ३ हे सर्वजण एकत्रीत वास्तव्यास आहेत किंवा कसे व सदरची घरमिळकत ही वि. प. १ यांच्या स्वतंत्र मालकी हककाची आहे किंवा कसे याबाबत कामामध्ये पुरावा येणे गरजेचे असल्याने ते गुणवत्तेवर ठरवता येईल. त्यामुळे वि. प. १ चा नि. १९ आणि वि. प. २ व ३ यांचा नि. २० वरील अर्जाबाबत खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

अर्ज नि.१९ व नि. २० नामंजूर करण्यात येतो.

Snehal Nivasrao Nikam

Digitally signed by Snehal Nivasrao Nikam
Location: Kolhapur
Date: 2019.10.23 17:28:21 +0530

कोल्हापूर (एस. एन. निकम)

दिनांक – २३.१०.२०१९ १५वे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर, कोल्हापूर.

**<u>–: प्रमाणपत्र :–</u>**

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ. निकालपत्र आदेश यामधील सर्व मजकूर मूळ निकालपत्र आदेशातील मजकूराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | पी. पी. इचलकरंजीकर |
| न्यायालयाचे नांव (श्रीमती एस.एन. निकम) | १५ वे सह दि.न्या.क स्तर, कोल्हापूर |
| श्रुतलेखन/टाईप केल्याचा दिनांक | २३/१०/२०१९ |
| न्यायिक अधिका–यांनी आदेशावर स्वाक्षरी केलेचा दिनांक | २३/१०/२०१९ |
| आदेश अपलोड केलेचा दिनांक | २३/१०/२०१९ |